# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९.०९.२०२४ (रविवार)**

---

## एमआयडीसी, बुटटीबोरी येथील गंगापूर झोपडपटटी ओयो हॉटेल चे समोर जबरी चोरी करणारे गुन्हेगाराना जेल बंद

(पोलीस स्टेशन, एमआयडीसी बुटटीबोरी येथे मोबाईल फोन जबरीने हिसकावून पळून नेणारे ०२ गुन्हेगारांना २ तासात ताब्यात घेवून मोबाईल फोन व मोटार सायकल जप्त करून गुन्हा उघडकीस आणून गुन्हेगारांना विरूध्द पोलीस स्टेशन, एमआयडी बुटटीबोरी जि. नागपूर ग्रामीणने केलेली धडाकेबाज कार्यवाही )

पोलीस स्टेशन, एमआयडीसी बुटीबोरी हददीत औद्योगित क्षेत्र असल्याने बाहेरील राज्यातून कंपनीत काम करण्याकरीता आलेला तक्रारदार नामे संजय निताई माहातो वय २८ वर्षे रा. ग्राम पोस्ट राधामोहनपूर पो .स्टे. डेबरा जि. पश्चिम मेधनीपुर पश्चिम बंगाल हे दि. २६/०९/२०२४ चे सकाळी ११/३० वा दरम्यान दुकानातून सामान घेवून कंपनीत जात असता रोड वर घोडा चा फोटो घेत असता एका मोटार सायकल वर दोन अनओळखी इसमानी त्यांचे हातातील ओपो कंपनी चा मोबाईल फोन किंमत १२,५००/—रूपये जबरीने हिसकावून पळून गेल्याने तक्रारदार घटनास्थळा वरून पोलीस स्टेशन एमआयडीसी, बुटटीबोरी येथे येवून घटनेची माहीती दिल्याने लगेच घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून घटनेची माहीती नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक श्री हर्ष पोद्दार यांनी नागपूर विभाग नागपूर व सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. दीपक अग्रवाल यांना देवून आदेशा प्रमाणे MIDC बोरी येथील डी.बी पथक यांना गुन्हेगाराचा शोध घेवून गुन्हा उघडकीस करण्याचे आदेश दिल्यावरून पोलीस स्टेशन, एमआयडीसी बुटटीबोरी येथील ठाणेदार श्री. सतीशसिंह राजपुत यांनी डी.बी पथक प्रमुख मपोउपनि ज्योत्स्ना गिरी, पो.हवा. लक्ष्मण बन्ने, पोलीस नाईक श्रीकांत गौरकार हे पोलीस स्टेशन परीसरात रवाना होवून घटनेसंबधात सर्व दिशेने अभ्यास करून तांत्रीक पुराव्यांचे आधारे गुन्हेगारांचे शोध घेवून २ तासात जबरी चोरी करणारे गुन्हेगार नामे— **१) पंकज मोहन बांगरे वय २१ वर्षे रा. सुकळी बेलदार त. हिगणा. २) प्रज्वल फिरोज आलोने वय २३ वर्षे रा. म्हाडा कॉलोनी बुटटीबोरी** यांना ताब्यात घेवून गुन्हयातील मोबाईल फोन किंमत १२,५००/—रूपये व गुन्हयात वापरलेली मोटार सायकल जप्त करून आरोपी जेल बंद केले. सदर गुन्हयातील आरोपीस दिनांक **२६.०९.२४** रोजी चे २२/३४ वा अटक करण्यात आले आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री हर्ष पोद्दार ( भापोसे ), नागपूर विभागाचे सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी मा. श्री. दीपक अग्रवाल ( भापोसे), यांचे मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक श्री. सतीशसिंह राजपुत, मपोउपनि श्रीमती ज्योत्स्ना गिरी, पो.हवा. लक्ष्मण बन्ने, पोलीस नाईक श्रीकांत गौरकार यांनी पार पाडली. जबरी चोरी करणारे गुन्हेगार यांना ताब्यात घेवून पुढील तपास सुरू आहे.

## हॉटेलमध्ये अवैधरित्या कुंटनखाना चालविणा—या हॉटेल चालक व मालकाविरूध्द कारवाई स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

पोलीस स्टेशन रामटेक हद्दीतील मौजा नगरधन गावाजवळ हॉटेल ऑल इज वेलकम चा मालक/मॅनेजर नामे मोनु यादव हा त्याचे हॉटेल मध्ये येणारे गि—हाईकांकरीता बाहेरून महीला बोलावुन गि—हाईक लोकांकडुन पैसे घेवुन लपुन छपुन कुंटनखाना चालवुन अवैध देहव्यापार चालवित आहे. अश्या गुप्त मुखबीरद्वारे मिळालेल्या खबरेची माहीती नागपुर जिल्हयाचे पोलीस अधिक्षक श्री हर्ष पोद्दार ( भापोसे ), यांना दिल्याने त्यांनी सदर ठिकाणी रेड करण्याचे आदेश दिले असता स्थानिक गुन्हे शाखेचे विषेश पथक नेमुन तसेच बनावट गि—हाईक पाठवुन पंचासमक्ष रेड कारवाई केली असता वेलकम हॉटेल मध्ये अवैध वैश्या व्यवसाय संबंधाने सापळा रचुन बनावट गि—हाईक यास हॉटेल मध्ये गि—हाईक बनवुन त्यास त्या ठिकाणी शारीरीक सुखाकरीता महीला उपलब्ध करून देणा—या इसमासोबत सौदा करून ठरलेल्या सौदयाची रक्कम देवुन हॉटेल मध्ये पाठवुन कायदेशीर रेड केली असता हॉटेल वेलकम मालक नामे— सोनु गोपालसिंग यादव वय ३१ वर्ष रा कंटोमेन्ट एरीया कामठी जि नागपुर व मॅनेजर नामे— मोनु गोपालसिंग यादव वय २८ वर्ष रा कंटोमेन्ट एरीया कामठी जि नागपुर यांनी आपले हॉटेल मध्ये पाठविलेल्या बनावट गि—हाईकला रूम उपलब्ध करून देवुन प्रणय क्रियेकरीता (शारीरीक उपभोगाकरीता) वैश्या व्यवसाय करणारी स्त्री हीला पैश्याचे मोबदला घेवुन पुरविली असल्याने मौक्यावर जप्ती पंचनमा कारवाई करून आरोपी हॉटेल मालक नामे— सोनु यादव यांचे जवळुन रोख रक्कम २९,१००/—रू व एक मोबाईल फोन किमती १०,०००/—रू आरोपी हॉटेल मॅनेजर याचे जवळून बनावट ग्राहक याने दिलेल्या नगदी १०००/—रू नगदी ४०००/—व ड्राव्हर मधील २५०/—रू असा एकुण ५२५०/—रू व ३ मोबाईल फोन किमती ३०,०००/—रू व इतर साहीत्य तसेच पिडीता स्त्री कडुन एक मोबाईल किमती १०,०००/—रू व नगदी ३४३५०/—रू असा एकुण ८४४९०/—रू चे साहीत्य पिडीता कडुन जप्त करून ताब्यात घेतले.

यातील हॉटेल मालक आरोपी नामे— १) सोनु गोपालसिंग यादव वय २८ वर्ष रा कामठी जि नागपुर २) हॉटेल मॅनेजर नामे— मोनु गोपालसिंग यादव वय २८ वर्ष रा कामठी जि नागपूर यांनी स्वताचे आर्थीक फायद्याकरीता संगणमताने वेलकम हॉटेल येथे अवैधरित्या देह व्यापार चालवित असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपीविरूध्द कलम ३,४,५ महीला अैनतिक व्यापार प्रतिबंधक कायदा सन १९५६ अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री हर्ष पोद्दार (भापोसे), अपर पोलीस अधिक्षक मा. श्री रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात, पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनि श्री मनोज गदादे, जिवन राजगुरू, पोहवा संजय बांते, दिनेश आधापुरे, आशिष भुरे, पोलीस नाईक विरेंद्र नरड, विपीन गायधने, मपोहवा नितु रामटेके, चालक पोहवा अमोल कुथे, सूमित बांगडे यांनी पार पाडली.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणा—या वाहनावर उमरेड पोलीसांची कारवाई

दिनांक २९/९/२०२४ रोजी पोलीस स्टेशन उमरेड चे पथक अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करणेकरीता फिरत असता दुपारी १२.३० वा दरम्यान मौजा पांजरेपार गावाच्या हद्दीत १६ चक्का टिप्पर अुनक्रमे १) एम एच ४० सीटी ५९३२ किमती ३५,००,०००/—रू त्यात १० ब्रास रेती विना परवाना किमती ५०,०००/—रू २) एम एच ३२ ए के १७८६ किमती ३५,००,०००/—रू ज्यात १० ब्रास विना परवाना रेती कि ५०,०००/—रू असा एकुण ७१,००,०००/—रू चा मुद्देमाल मिळुन आल्याने नमुद टिप्पर चे दोन्ही चालक आरोपी नामे— १) सैफुद्दीन सय्यद वय ३८ वर्ष रा मसाळा ता वर्धा २) राजेंद्र बबनराव वांदीले वय ४३ वर्ष रा सेलू ता जि वर्धा यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला.

तसेच दुपारी १४.०० वा दरम्यान एक १४ चाकी ट्रक क्र. एम एच ३२ एके ५९३२ किमती ३५,००,०००/—रू मध्ये टिप्पर चालक आरोपी नामे— विलास राधेश्याम नगरे वय २७ वर्ष रा आंधळगाव ता मोहाडी जि भंडारा याने ०९ ब्रास रेती किमती ४५०००/—रू ची विना परवाना अवैधरित्या वाहतुक करतांना मिळुन आल्याने किमती ३५,४५,०००/—रू चा माल जप्त करण्यात आला आहे. असे तिन्ही टिप्पर व मुद्देमाल असा एकुण **१०६४५०००/—रू चा माल हस्तगत करण्यात आला आहे.** वरील दोन्ही घटनेच्या संबंधाने पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहीता सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम १९८४ सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ सहकलम १३०/१७७ मोटर वाहन अधिनियम अन्वयें गुन्हे दाखल करण्यात आले आहे असुन नमुद तिन्ही टिप्पर चालकांना दिनांक २९/९/२४ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक मा. श्री हर्ष पोद्दार (भापोसे), अपर पोलीस अधिक्षक मा. श्री रमेश धुमाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती वृष्टी जैन उमरेड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन उमरेड चे पोलीस निरीक्षक श्री अनिल राउत, पोलीस अंमलदार राधेश्याम कांबळे, मंगेश फेदजवार, विनोद भोयर, पंकज बट्टे, गोवर्धन सहारे, तसेच होमगार्ड सैनिक वैभव बोळे, सुमीत यांनी पार पाडली.

**सदर बातमीचा फोटो सोबत जोडलेला आहे.**



## गळफास लावुन आत्महत्या

पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत हेटी पेठबुधवार काटोल येथे दिनांक २८.९.२४ चे दुपारी २.५० वा. दरम्यान यातील फिर्यादी याला त्याचे भाची दिक्षा हिने फोन करून माहीती दिली की भाचा योगेश याने आपले घरी गळफास लावुन मरन पावला आहे असे सांगितले वरून फिर्यादी यांनी हेटी येथे बहीनीचे घरी जावुन पाहीले असता तेथे योगेश घरात गळफास घेवुन लटकलेला होता. बहीनीला काय झाले विचारले असता तिला काहीच माहीत नसल्याचे सांगितले तेव्हा फिर्यादीला भाची ने सांगितले की तो १२.०० वा. कामावर गेला होता व कामावरून दुपारी २.०० वा. घरी परत आला, तेव्हा घरी कोनीही नव्हते, भाची सुध्दा लायबरी मध्ये गेली होती व आई घराबाहेर गेली होती. भाची लायबरी मधुन घरी परत आली, तेव्हा योगेश हा गळफास घेवुन लटकलेला दिसला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रमेश मारोतराव कुंभरे वय ४८ वर्ष रा. खोजे ले आउट ता. काटोल याचे रिपोर्टवरून सदर मर्ग नोंद करून तपासात घेतला. सदर मर्गचा पुढील तपास नापोशि संतोष राठोड पो.स्टे. काटोल करीत आहे.

# अकस्मात मृत्यु

पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत बोरी नहराजवळ यातील मृतक नामे सुनिल गेंदलाल वरठी वय ३४ वर्षे रा. बोरी ता.रामटेक हा शेतातुन काम करून घरी परत येत असता गावाजवळील नहरामध्ये हात पाय धुत असतांनी त्याचा पाय स्लिप झाल्याने नहराचे पाण्यात पडुन बेशुध्द झाला. त्यास उपचाराकरीता उपजिल्हा रूग्णालय रामटेक येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मरण पावल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— नरेश चरन बरवे वय ४२ वर्षे रा. बोरी ता. रामटेक याचे रिपोर्टवरून सदर मर्ग नोंद करून तपासात घेतला. सदर मर्गचा पुढील तपास पोलीस नाईक नितीन गि—हेपुंजे मो.नं ७३०४०४००००० करीत आहे.

पोलीस माहीती कक्ष
नागपुर ग्रामीण जि नागपुर